



■ २२ कॅरेट सोने दर : १,४१,१००/- ■ चांदी दर : २,६०,०००/-


शब्दांना सत्याची धार

# प्रहार

सिंधुदुर्ग • शुक्रवार ८ मे, २०२६

RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ • वर्ष २२ • अंक १७८ • पाने ८ • ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in




मिचेल मार्शच्या वादळी शतकापुढे पाऊस निष्प्रभ

पान ८

# विजयदुर्गात जहाजबांधणी प्रकल्पासाठी पायाभूत सुविधा उभारा – ना. नितेश राणे

## जहाजबांधणी उद्योगासाठी स्थळ निवडीच्या प्रक्रियेला वेग; तांत्रिकदृष्ट्या सक्षम स्थळांचा आढावा

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील जहाजबांधणी व सागरी पायाभूत सुविधा विकासाच्या दृष्टीने नांदगाव, दिघी आणि विजयदुर्ग या तीन संभाव्य स्थळांचा सविस्तर तांत्रिक व आर्थिक आढावा घेण्यात आला असून, सिंधुदुर्ग जिल्ह्यास प्राधान्य देत संबंधित स्थळांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण, पुनर्भरण, ट्रॅफिक लाँचिंग तसेच सागरी पायाभूत सुविधांच्या नियोजनाबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. जहाजबांधणी उद्योगात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या ऑपरेटर्सना प्राथमिक स्वरूपातील



माहिती व अहवाल उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. यावेळी जहाजबांधणी प्रकल्पासाठी संभाव्य स्थळांबाबत तांत्रिक क्षमता, समुद्रातील खोली, भूगर्भीय स्थिती, संपर्क व्यवस्था आणि भविष्यातील औद्योगिक संधी संदर्भात सविस्तर सादरीकरण करण्यात आले. बैठकीस महाराष्ट्र सागरी महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी प्रदीप, हस्कोनिंग कंपनीचे जॉन सम्यूएल, श्री. बिजापूर, तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

नांदगाव परिसर पालघर जिल्ह्यात असून मुंबईपासून सुमारे १४० किलोमीटरवर आहे. तसेच हा परिसर तारापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या जवळ असल्याने त्याचे धोरणात्मक महत्त्व वेगळे आहे. मात्र, या भागातील भूगर्भीय रचना अतिशय सैल गाळयुक्त असून कमी खोलीवर कठीण खडक असल्याने मोठ्या प्रमाणावर ड्रेजिंग करावे लागणार असल्याने समुद्रातील आवश्यक खोली मिळविण्यासाठी सुमारे चार किलोमीटरपर्यंत समुद्रात जावे लागणार असल्याचे नमूद करण्यात आले. हा परिसर सीआरझेड-१ व सीआरझेड-३ क्षेत्रात येत असल्याने पर्यावरणीय बाबींचाही विचार करावा लागणार असल्याचे सांगण्यात आले.

नांदगाव परिसर राष्ट्रीय महामार्ग, समर्पित मालवाहतूक मार्ग (Dedicated Freight Corridor) आणि (पान २ वर)

# बंगालमध्ये रक्तरंजित थरार!

## सुवेंदू अधिकारी यांच्या पीएची गोळ्या झाडून हत्या ; ममता बॅनर्जींचा कट असल्याचा भाजपचा आरोप

**कोलकाता (वृत्तसंस्था)**

पश्चिम बंगालच्या निवडणुकीत जायंट किलर ठरलेले भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ यांच्या हत्याने संपूर्ण बंगाल हादरले आहे. परगणा जिल्ह्यातील मध्यग्राम येथे बुधवारी रात्री भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक चंद्रनाथ रथ यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. हल्लेखोरांनी त्यांच्या गाडीचा पाठलाग केला आणि त्यानंतर दोहरिया परिसरात गोळीबार केला. स्थानिक सूत्रांनुसार, चार गोळ्या झाडण्यात आल्या, त्यापैकी तीन गोळ्या चंद्रनाथ यांच्या डोक्यात लागल्या. चंद्रनाथ रथ हे एका कामानिमित्त कारने जात असताना हल्लेखोरांनी त्यांची गाडी थांबवली. गाडी थांबताच दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी चंद्रनाथ यांच्यावर



गोळीबार केला. यात गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या चंद्रनाथ यांना रुग्णालयात नेण्यात आले, जिथे नंतर त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी भाजप नेते शुभेंदू अधिकारी यांनी असा आरोप केला आहे की, चंद्रनाथ रथ यांची अनेक दिवस पाळत (रेकी) ठेवून हत्या करण्यात आली आहे. बुधवारी रात्री मध्यमग्राम येथील एका रुग्णालयाबाहेर केंद्रीय मंत्री सुकांत मुजुमदार यांच्यासोबत असताना अधिकारी यांनी हे वक्तव्य केले.

अधिकारी यांनी बुधवारी उशिरा प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, "मला आत्ताच कोणतीही टिप्पणी करायची नाही, परंतु या हत्येमागे काही राजकीय कारणे असावीत असे मला वाटते. पोलीस त्यांचा तपास करत आहेत आणि माझा त्यांच्यावर विश्वास आहे. ते पुढे म्हणाले, "मी पश्चिम बंगालचे पोलीस महासंचालक सिद्धनाथ गुप्ता यांच्याशी चर्चा केली आहे. सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर काही महत्त्वाचे धागेदोरे हाती आले आहेत. आम्हाला आशा आहे की मारेकऱ्यांना लवकरच अटक केली जाईल.

तपासात अडथळा येऊ नये आणि तो निष्पक्ष व्हावा, या उद्देशाने पक्षाने जाणूनबुजून (पान २ वर)

# ममता बॅनर्जींचे मंत्रिमंडळ बरखास्त

**कोलकता**

ममता बॅनर्जी यांनी विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता. आमचे सरकार बरखास्त करा पण मी राजीनामा देणार नाही, असा आक्रमक पवित्रा ममता बॅनर्जी यांनी घेतला होता. या सत्तासंघर्षानंतर अखेर बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी पश्चिम बंगाल मंत्रिमंडळ बरखास्त केल्याची माहिती समोर आली आहे. या घडामोडींमुळे राज्यात मोठा घटनात्मक आणि राजकीय पेच निर्माण झाला असून, संपूर्ण देशाचे लक्ष आता पश्चिम बंगालमधील सत्तांतराकडे लागले आहे.

तृणमूल काँग्रेस प्रमुख ममता बॅनर्जी यांनी निवडणुकीचा निकाल हा "जनादेश नसून कट" असल्याचा आरोप करत राजीनामा देण्यास स्पष्ट नकार दिला. इतकेच नव्हे तर, तृणमूल काँग्रेसचा पराभव जनतेच्या कौलामुळे नसून निवडणूक प्रक्रियेत झालेल्या कथित गैरप्रकारांमुळे झाला आहे. माझ्या राजीनाम्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आम्ही भाजपशी

### बंगालच्या राजकारणात उलथापालथ



नव्हे, तर भाजपसाठी काम करणाऱ्या निवडणूक आयोगाशी लढलो. बंगाच्या निवडणुकीत सुमारे १०० जागांवर मतदान प्रक्रियेत गडबड झाल्याचा आरोपही केला.

दरम्यान, राज्यघटनेनुसार विधानसभा कार्यकाळ संपल्यानंतर आणि नवीन सरकार स्थापन न झाल्यास राज्यपालांकडे विशेष अधिकार येतात. घटनातज्ज्ञांच्या मते, मुख्यमंत्री बहुमत गमावल्यानंतर किंवा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर राज्यपाल मंत्रिमंडळ बरखास्त करण्याचा (पान २ वर)

### शपथविधी ९ मे रोजी?

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये भाजपचे पहिले सरकार स्थापन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भारतीय जनता पक्ष विधिमंडळ पक्षाची बैठक लवकरच होणार असून मुख्यमंत्रीपदासाठी नेत्याची निवड केली जाणार आहे. कोलकाता येथील ब्रिगेड परेड मैदान येथे ९ मे रोजी शपथविधी सोहळा होण्याची शक्यता असून, त्यासाठी मोठी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि इतर वरिष्ठ भाजप नेते उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# दहावीचा आज निकाल

## दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार

**मुंबई (वृत्तसंस्था)**




महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवार ८ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर होणार आहे. निकालापूर्वी सकाळी ११ वाजता मंडळाकडून पत्रकार परिषद घेऊन निकालाची अधिकृत घोषणा केली जाईल, ज्यानंतर विद्यार्थ्यांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर आपला निकाल पाहता येईल.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवार ८ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. राज्य मंडळाने यासंदर्भातील अधिकृत घोषणा केली असून, परीक्षेला बसलेल्या लाखो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपणार आहे. विद्यार्थ्यांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवरून आपला निकाल पाहता येईल. (पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या कामात हलगर्जीपणा खपवून घेणार नाही

## आमदार निलेश राणे यांनी कृषी अधिकाऱ्यांना बजावले

**कुडाळ (प्रतिनिधी)**

शासनाकडून शेतकऱ्यांसाठी एवढ्या चांगल्या योजना असून त्या योजना कृषी विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांकडून राबविल्या गेल्या तर या ठिकाणचा शेतकरी आर्थिक समृद्ध होईल असे आमदार निलेश राणे यांनी सांगून यापुढे शेतकऱ्यांच्या बाबतीत कोणतीही सबब ऐकून घेतली जाणार नाही शेतकऱ्यांची कामे आणि त्यांच्या योजना त्यांच्या बांधापर्यंत घेऊन जा अन्यथा कारवाईला सामोरे जा, अशा कडक शब्दात कृषी अधिकाऱ्यांना आमदार निलेश राणे यांनी बजावले.

कुडाळ येथे कुडाळ व मालवण तालुक्यातील कृषी विभागाची खरीप हंगामाची आढावा बैठक आमदार निलेश राणे यांनी घेतली. यावेळी जिल्हाप्रमुख दत्ता सामंत, माजी आमदार राजन तेली, जिल्हा परिषद




अधिकाऱ्यांशी चर्चा करताना आमदार निलेश राणे (छाया– प्रथमेश जाधव)

उपाध्यक्ष दादा साईल, जिल्हा परिषद बांधकाम सभापती संतोष साठविलकर, सभापती मिलिंद नाईक, तहसीलदार सचिन पाटील, मालवण तहसीलदार गणेश लव्हे, जिल्हा कृषी अधीक्षक भाग्यश्री नाईक नवरे, विभागीय कृषी अधिकारी उमाकांत पाटील, अनिकेत कदम, मालवण तालुका कृषी अधिकारी श्रीपाद चव्हाण उपस्थित होते.

या आढावा बैठकीमध्ये कुडाळ व मालवण तालुक्यातील कृषी अधिकाऱ्यांनी वर्षभरामध्ये कोणत्या प्रकारे कृषी विभागाने काम केले आणि (पान २ वर)

# पशुसंवर्धन विभागात बंपर भरती

## ३,१०३ पदांसाठी ११ जूनला होणार परीक्षा

### एमपीएससीमार्फत होणार भरती प्रक्रिया

**मुंबई**

राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवांवर पडणारा ताण कमी करण्यासाठी या पदांच्या भरती प्रक्रियेला गती देण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट 'अ'च्या २ हजार ७९५ आणि सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन गट 'अ'च्या ३०८ पदांसाठी संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ही परीक्षा ११ जून २०२६ रोजी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे होणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केले असून संबंधित उमेदवारांची परीक्षा सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत होणार असल्याचे नमूद केले आहे. परीक्षेतील गुणांच्या आधारे स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार असून त्यानंतर पुढील निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

राज्यातील पशुसंवर्धन विभागात मोठ्या प्रमाणावर अधिकारी रिक्त असल्याने पशुवैद्यकीय सेवा, पशुधन आरोग्य तपासणी, लसीकरण आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यात अडचणी येत होत्या. (पान २ वर)

# माझी आमदारकी भाजपच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना समर्पित : आमदार प्रमोद जठार

- कोकणचा विकास आणि रोजगारालाच प्राधान्य
- सावंतवाडी भाजप कार्यालयात जंगी स्वागत

**सावंतवाडी (प्रतिनिधी)**

माझी आमदारकी ही भारतीय जनता पार्टीच्या नव्या आणि जुन्या कार्यकर्त्यांच्या कष्टाला समर्पित असून, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या आशीर्वादाने आगामी काळात जनहितार्थ काम करणार आहे. पुढची सहा वर्षे शतप्रतिशत भाजपचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवत कोकणच्या विकासाला माझे सर्वोच्च प्राधान्य असेल. कोकणच्या विकासात जो काही बॅकलॉग शिल्लक राहिला आहे, तो सरकारचा दुवा बनून पूर्णपणे भरून काढेन, असा ठाम विश्वास भाजपचे विधानपरिषदेचे नवनिर्वाचित आमदार प्रमोद जठार यांनी व्यक्त केला. आमदार पदी निवड झाल्यानंतर सावंतवाडी येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात आयोजित (पान २ वर)



# वैभववाडी, दोडामार्ग व आचरा परिसराला चक्रीवादळाचा तडाखा

- घरांचे, गोठ्यांचे तसेच आंबा पिकाचे मोठे नुकसान
- कोकिसरे रेल्वे फाटकाजवळ वडाचे झाड रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक ठप्प
- आचरा परीसरात घराचे छप्पर उडाले
- उकाड्याने हैराण नागरिकांना दिलासा

**सिंधुदुर्गनगरी**

गेल्या काही दिवसांपासून अंगाची लाहीलाही करणाऱ्या उकाड्याने जिल्हावासीय अक्षरशः हैराण झाले होते. मात्र, आज सायंकाळच्या सुमारास अचानक आकाशात ढग दाटून आले आणि सोसाट्याचा वारा वाहू लागला. त्यानंतर काही वेळातच विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. वैभववाडी तालुक्यात जोरदार चक्रीवादळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले. चक्रीवादळामुळे अनेक ठिकाणी



वैभववाडी तालुक्यात चक्रीवादळाने वृक्ष कोसळून घराचे नुकसान झाले. (छाया: नरेंद्र कोलते.)

घरांचे, गोठ्यांचे तसेच आंबा पिकाचे मोठे नुकसान झाले. कोकिसरे रेल्वे फाटकाजवळ वडाचे झाड रस्त्यावर कोसळल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.दोडामार्ग तालुक्याला पावसाने अक्षरशः झोडपून काढले. सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह आलेल्या या तुफान पावसाने तालुक्यात मोठी दाणादाण उडवून दिली. अनेक घरांचे छप्पर उडाले असून आंबा, काजू, सुपारी व केळीच्या बागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. आचरा परीसरालाही वादळी वाऱ्यासह (पान २ वर)